# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २८८ वा ❑ गुरूवार दि.१५ जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## शिक्षण व्यवस्थेत मराठी भाषेचे महत्व वाढविण्याची गरज

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

शिक्षण व्यवस्थेत मराठी भाषेचे महत्त्व वाढवणे आवश्यक आहे कारण मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने विद्यार्थ्यांची आकलनशक्ती सुधारते, त्यांना सांस्कृतिक जोड मिळते, ग्रामीण व आर्थिकदृदृष्ट्या मागासलेल्या मुलांना शिक्षणाची संधी मिळते आणि मराठीतील समृद्ध साहित्य व ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचते; यासाठी दर्जेदार मराठी संसाधने, शिक्षक प्रशिक्षण आणि अभ्यासक्रमात आधुनिकीकरण आवश्यक आहे, जेणेकरून मराठी भाषिक तरुणांना रोजगार आणि सामाजिक जीवनात अधिक फायदा होईल.

प्रश्न असा आहे की,

दर्जेदार मराठी पाठ्यपुस्तके, डिजिटल साहित्य आणि प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता आहे, तसेच इंग्रजीच्या वाढत्या प्रभावामुळे मराठीवर दबाव वाढत आहे. एकीकडे मराठी भाषा अनिवार्य करण्याचे सरकारचे धोरण आहे तर दुसरीकडे मराठी माध्यमांच्या शाळा बंद होत आहे.हा दुटप्पीचा खेळ सरकार खेळत आहे.राज्यात मराठी माध्यमांच्या बहुतांश शाळा अनुदानित आहेत.. विद्यार्थी संख्या अभावी त्या शाळा बंद होतात एकीकडे मराठी भाषेचा उदो उदो करायचा तर दुसरीकडे इंग्रजी माध्यमाच्या शाळांना परवानगी द्यायची असा खेळ सरकार व शिक्षण विभाग करत आहे. परिणामतः मराठी माध्यमांच्या शाळांवर अवकाळा येत आहेत. पायाभूत सुविधांचा अभाव भौतिक सुविधांचा अभाव, शिक्षकांची कमतरता ,मराठी माध्यमाच्या शाळा डिजिटल नसणे या व अशा अनेक कारणांमुळे विद्यार्थी मराठी शाळांकडे पाठ फिरवित आहे.अशा परिस्थितीत मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश घ्यायला पालक तयार नाहीत.

शिकण्याच्या व्यवस्थेत मराठी भाषेला अधिक महत्त्व देणे म्हणजे केवळ भाषा जतन करणे नव्हे, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक व आर्थिक प्रगती करणे आहे.

विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण मिळायलाच पाहिजे..किंवा अभ्यासक्रमात मराठी भाषेची अनिवार्यता असायलाच हवी. यासाठी मराठी भाषेचे जतन आणि संवाद व्हायलाच पाहिजे याबाबतीत सरकारने ठोश व प्रभावी उपाययोजना करायला पाहिजे मात्र सरकार मराठी बाबत फारशी गंभीर नाही अलीकडे उच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करत मराठी शाळा उरणार नाहीत तर अविजात दर्जा टिकणार कसा असा प्रति प्रश्न उपस्थित करत सरकारची कान उघडणे केली. राज्यात सातत्याने बंद पडत असलेल्या मराठी माध्यमांच्या शाळांबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य सरकारला क** शब्दात फटकारले मराठी शाळांमध्ये विद्यार्थी मिळत नसल्यामुळे शाळा बंद कराव्या लागत असल्याचा अजब युक्तिवाद सरकारतर्फे करण्यात आल्यानंतर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली राज्यात मराठी शाळाच अस्तित्वात राहिल्या नाहीत तर अभिजात मराठी भाषेचा दर्जा कसा टिकून राहणार असा प्रश्न उच्च न्यायालय उपस्थित केला. योगेश नव्हे तर मराठी शाळांमध्ये विद्यार्थी कमी होण्यामागील वास्तविक कारणांचा शोध का घेतला जात नाही अशी खंतही उच्च न्यायालयाने व्यक्त केली काही शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये किंवा नोकऱ्यांमध्ये मराठी भाषेचे ज्ञान पात्रता म्हणून अनिवार्य करता येऊ शकते असा सल्ला देखील न्यायालयाने दिला शिक्षण व्यवस्थित मराठी भाषेचे महत्त्व न वाढविल्यास विद्यार्थी मराठी माध्यमाकडे कसे आकर्षित होतील असा प्रश्नही न्यायालयाने केला.

मराठी भाषेचे महत्व ,जतन व संवर्धन करण्यासाठी मुलांना मातृभाषेतून शिक्षण उपलब्ध करून द्यायलाला पाहिजे.मुले मातृभाषेतून उत्तम शिकतात, ज्यामुळे संकल्पना स्पष्ट होतात आणि शिक्षणात प्रगती होते.

मराठी भाषा महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती आणि परंपरा जपते, जी जागतिकीकरणामुळे धोक्यात येऊ शकते. मराठी माध्यमातून शिक्षण घेतल्यास ग्रामीण आणि वंचित घटकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते आणि ते मुख्य प्रवाहात येतात. मराठी भाषेतून शिक्षण उपलब्ध करून दिल्यास रोजगाराची संबंधित वाढ होते.

महाराष्ट्र हे औद्योगिक केंद्र असल्याने, मराठी भाषेचे ज्ञान नोकरीच्या संधी वाढवते, विशेषतः शिक्षण, मीडिया आणि स्थानिक व्यवसायात. मराठी भाषेतील समृद्ध साहित्य आणि आधुनिक ज्ञान मराठीत उपलब्ध झाल्यास विद्यार्थ्यांची बौद्धिक वाढ होते.

# साहित्य संस्था वाचवा : डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे भावनात्मक आवाहन

ज्योतिर्मय साहित्य

नागपूर : गेली ५५ वर्षे केवळ व्यापक मराठी हित आणि विदर्भ साहित्य संघाचेही व्यापक संस्थात्मक हित ज्यात असेल अशीच, सर्व अस्मितांच्या सर्व प्रवाहांना संस्थेशी जोडून घेणारी सर्वसमावेशक भूमिका विदर्भ साहित्य संघ, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळात व संस्थेबाहेरही सर्वत्र घेतलले व मराठीला अभिजात दर्जा मिळवण्याचा संघर्ष, मराठी विद्यापीठ स्थापनेचा पाठपुरावा, दहावीपर्यंत मराठी विषय सक्तीचा कायदा करून घेणे, सांस्कृतिक धोरणाचे पुनरीक्षणाचा पाठपुरावा, हिंदी आणि तिसरी भाषा सक्तीचे शासन निर्णय मागे घ्यायला शासनाला बाध्य करणे या व अशा: अनेक भाषा, साहित्य, संस्कृतीविषयक बाबींच्या चळवळीचे एक अध्वर्यू, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, संस्थेच्या निवडणुकीत व्यक्तिगत आकांक्षा बाळगण्याऐवजी

सर्व इच्छुकांनी एकत्र बसून, चर्चा करून, विवेकी विचाराने, संस्थेसमोरील खऱ्या आव्हानांचा विचार करून, जे करणे आवश्यक आहे त्या दृष्टीने विचार करावा असे अतिशय भावनात्मक आवाहन केले आहे. इच्छा असल्यास व प्रयत्न केल्यास ते अशक्यही नाही असे डॉ जोशी यांनी त्यात म्हटले आहे.

प्रत्येकच निवडणुकीच्या वेळी अध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून श्रीपाद भालचंद्र जोशी या नावाचा विचार होत गेला मात्र त्या त्या वेळी संस्थेचे हित ज्यात होते अशीच कृती करत प्रा राम शेवाळकरांपासून तो मनोहर



म्हैसाळकरांपर्यंतचे अध्यक्ष होऊ दिले गेले होते याचे स्मरण करून देत संस्थेवर वेळोवेळी आलेल्या संकटातून म्हणूनच एकजुटीने ही संस्था वाचू शकली, सुरक्षितरित्या संस्था इथवर आजच्या स्थितीपर्यंत, सर्व जुने, जाणते, नवे, सर्वांशी संवादी राहत असे आणता येवू शकले, संस्थेवर जेव्हा कार्यालय इथून तिथे घेऊन फिरत राहण्याची वेळ आली तेंव्हा त्या आर्थिक विपन्नावस्थेत स्वतः सारा खर्च करत, त्याही अवस्थेत संस्थेच्या कार्याचा दर्जा, गुणवत्ता, व्यापकता, विविधता सारे कसे टिकवून धरले गेले होते यांचेही स्मरण करून दिले आहे.

मात्र आता नव्या, जुन्यांशी तो संवाद, शाखांशी संवाद, संस्थेचे घटनात्मक उद्देशपूर्तीसाठी त्यानुसार करायचे प्रभावी व आवश्यक ते काम हे सारेच हरवल्याचे चित्र आहे.त्याची कारणे वाङ्मयीन चळवळ म्हणजे काय हे जाणून, समजून, उमजून संस्था पुढे नेणाऱ्या कळकळीच्या वाङ्मयीन नेतृत्वाचा असणारा अभाव, केवळ स्वतः पुरते न बघता संस्था स्वायत्त राखण्याची, कोणत्याही शक्ती, नको नको ती तत्त्व या पासून संस्था सुरक्षित राखण्याची इच्छाशक्ती व दूरदृष्टीचा अभाव ही असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या सर्वच घटक संस्था ताब्यात घेण्यासाठी आज विशिष्टच विचारसरणी व त्यांचा राजकीय हस्तक्षेप मागण्यापर्यंत लोक जात आहेत,नको नको ती तत्त्व,सरकारचा हस्तक्षेप, नियंत्रण वाढून विदर्भ साहित्य संघासह या संस्थांची स्वायत्तता नष्ट करण्यासाठी काय प्रयत्न,कसे चालले आहेत हे देखील नुकतेच त्यांनी दोन स्वतंत्र लेख लिहून ज समोरही आणले त्याकडे या आवाहनात त्यांनी लक्ष वेधले आहे.त्यामुळे या संस्था वाचवल्या पाहिजेत त्यासाठी

विदर्भ साहित्य संघाच्या जे व्यापक हिताचे असेल ते सारे, वैयक्तिक कोणासाठी नव्हे, तर संस्था हितास्तव करण्यासाठी सर्व इच्छुकांनी एकत्र बसून, चर्चा करून, विवेकी विचाराने, संस्थेसमोरील आव्हानांचा विचार करून, जे करणे आवश्यक आहे त्या दृष्टीने विचार करावा असे त्यांनी म्हटले आहे.


# धाग्यावर अडकलेली गोडी

ज्योतिर्मय साहित्य

संक्रांती हा गोडव्याचा, आपुलकीचा आणि स्नेहाचा सण. आकाशात रंगीबेरंगी पतंग, अंगणात हसू आणि हातात तिळगूळ – अशी या सणाची ओळख. मात्र याच आनंदाच्या आकाशात फिरणारी बारीक, चमकदार मांजा कधी कोणाचा श्वास थांबवेल, याचा नेम नाही. क्षणात आनंदाचा सण शोकात बदलतो आहे आणि हेच आजचे कटू वास्तव आहे.

काही वर्षांपूर्वी पुण्यात दुचाकीवरून जात असताना मांजेमुळे गळा चिरून एका डॉक्टर तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. तो प्रसंग केवळ एका कुटुंबापुरता मर्यादित राहिला नाही; संपूर्ण समाज हादरून गेला. शिक्षण, कष्ट आणि सेवाभाव यांचे प्रतीक असलेले एक उमदे आयुष्य क्षणार्धात संपले. तरीही आपण त्यातून पुरेसा धडा घेतला का, हा प्रश्न आजही अनुत्तरितच आहे. कारण नंतर नाशिकमध्ये, भुवनेश्वरमध्ये आणि इतर शहरांत अशाच घटना पुन्हा घडल्या. ठिकाणे बदलली, चेहरे बदलले; पण धोका मात्र तोच.

आज मांजा ही केवळ पतंग उडवण्याचे साधन उरलेली नाही; ती एक अदृश्य, पण प्राणघातक धोका बनली आहे. काचेची पूड, रासायनिक पदार्थ आणि नायलॉनच्या धाग्यांनी





मंगेश दौंडकर,
पुणे, मो.- 9890619354

बनलेली ही मांज माणसाच्या त्वचेसोबतच स्वप्नेदेखील कापते. दुचाकीस्वार, पादचारी, लहान मुले, पक्षी – कोणीही तिच्यापासून सुरक्षित नाही. गळा चिरला जाणे, चेहऱ्यावर कायमचे व्रण राहणे, पक्ष्यांचे पंख तुटणे – हे केवळ अपघात नसून आपल्या असंवेदनशीलतेची साक्ष आहेत.

बंदी असतानाही अशी मांज बाजारात सहज उपलब्ध होत असल्याचे चित्र वारंवार समोर येते. याचा अर्थ अंमलबजावणीत कुठेतरी कमतरता आहे. काही दिवस मोहिमा राबवल्या जातात, जप्त्या होतात; मात्र सण संपल्यानंतर पुन्हा सर्व काही पूर्ववत होते. ही परिस्थिती केवळ यंत्रणांपुरती मर्यादित नसून, समाज म्हणून आपण सगळेच त्याचे भागीदार आहोत.

पालकांसाठीही हा आत्मपरीक्षणाचा क्षण आहे. आपण मुलांच्या हाती काय देतो, ते कशासाठी वापरले जाते, याची जाणीव आपल्याला आहे का? 'सण आहे, खेळू दे' या निष्काळजी भूमिकेची किंमत कधी कोणाच्या तरी जीवावर बेतू शकते. याचबरोबर शाळांची भूमिकाही महत्त्वाची आहे. जबाबदारीचे संस्कार लहानपणीच रुजतात. पतंग उडवताना सुरक्षिततेचे नियम, नायलॉन मांजेचे धोके आणि इतरांच्या जीवाची किंमत – हे धडे वर्गात दिले गेले, तर उद्याचे नागरिक अधिक सजग होतील. एक योग्य समज एखादे घर शोकापासून वाचवू शकते.

मांजेची विक्री आणि वापर यावर प्रभावी नियंत्रण आणणे, तसेच नियमांची काटेकोर अंमलबजावणी होणे, ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर व्यापक जनजागृतीही तितकीच आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, गृहनिर्माण संस्था आणि माध्यमे – सर्वांनी एकत्र येऊन हा संदेश ठामपणे पोहोचवला पाहिजे की कोणतीही 'मजा'कोणाच्या जीवावर बेतू नये. संक्रांतीचा सण गोड बोलण्याचा आहे, रक्त सांडण्याचा नाही. आज आपण जागरूकतेचा मार्ग स्वीकारला, तर उद्याची संक्रांती खऱ्या अर्थाने गोड होईल. आनंद साजरा करताना इतरांच्या जीवाची किंमत जपली गेली, तरच सणाला अर्थ उरेल. अन्यथा धाग्यावर अडकलेली ही गोडी कधीही कुणाच्या आयुष्याचा शेवट ठरू शकते – आणि ती जबाबदारी आपलीच असेल.









# जात्यावरच्या ओव्या......

नही सोन-नाणं
देली आंदण गाय
अस वाटे गावजना
जणू लेकी संग माय ||४४८||

ढोरंवासर हंबरती
गावाच्या शिवारात
गेली पळून अवदसा
नही आली वं परत|| ४४९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# आकाश कवेत, पाय मात्र जमिनीवर





ज्योतिर्मय साहित्य

या सगळ्या थोर व्यक्तींनी दाखवून दिले आहे की, पद माणसाला मोठे करत नाही, तर कर्तृत्व आणि नम्रता या गुणांमुळे माणूस मोठा होतो. कवी दत्ता हलसगीकर आपल्या कवितेत म्हणतात

''आभाळाएवढी उंची ज्यांची,
त्यांनी थोडे खाली झुकावे,
मातीत मळले जन्म ज्यांचे,
त्यांना जरा उचलून घ्यावे...''

महाराष्ट्राच्या मातीतील संतांनी तर ही उंची प्रत्यक्ष जगून दाखवली. संत गाडगेबाबा यांनी आयुष्यभर हातात खराटा घेऊन स्वच्छतेचे कार्य केले. लोक त्यांच्या चरणी नतमस्तक व्हायचे, पण ते स्वतः मात्र गरिबांच्या झोपड्यांत जाऊन त्यांना उचलून धरण्याचे काम करत राहिले. त्यांनी सत्तेच्या सावलीलाही स्पर्श केला नाही. तर दुसरीकडे साने गुरुजी यांनी आपल्या साध्या राहणीतून आणि उच्च विचारांतून समाजाला माणुसकीचे धडे दिले. त्यांनी कधीही राजकीय पदाची अभिलाषा धरली नाही, उलट मातीत मळलेल्या कष्टकरी वर्गाला स्वाभिमान मिळवून दिला.




आज आपण पाहतो की, कोणत्याही छोट्या पदासाठी लोक एकमेकांचे पाय ओढतात. आधी सिद्धी आणि मग प्रसिद्धी हे जीवनाचे सूत्र आहे. यशाचा मंत्र आहे. पण याचा विसर पडल्यामुळे केवळ नावासाठी आणि प्रसिद्धीसाठी धावणारी माणसांची शर्यत दिसते. खरी श्रेष्ठता आधी सिद्ध करण्यात असते. मग प्रसिद्धी आपोआपच मिळते. न मागे तयाची रमा होय दासी असे म्हटले जाते. ज्यांच्याकडे खरोखरच उंची असते, त्यांना ती ओरडून सांगावी लागत नाही; ती त्यांच्या नम्रतेतूनच झळकत असते.


शिखरावर जाणे महत्त्वाचे आहेच, पण त्याच वेळी पाय जमिनीवर असणे हे त्याहूनही अधिक महत्त्वाचे आहे. कारण जमिनीवर पाय असतील तरच माणसाला दुसऱ्याची वेदना समजते आणि आकाशाचा आवाका उमजतो. या सगळ्या व्यक्तींच्या कवेत आकाश होते पण पाय मात्र जमिनीवर होते.

कविवर्य बा भ बोरकर यांच्या लावण्यारेखा या कवितेतील या ओळी मला फार आवडतात. ते म्हणतात

जीवन त्यांना कळले हो
मी पण ज्यांचे पक्व फळापरी
सहजपणाने गळले हो.

***



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# चतुर्दशब्रम्हनिरूपण


ज्योतिर्मय साहित्य

उपाधिशुन्य सद्वस्तु स्वतः बनणे म्हणजेच सहज समाधी होय. समाधी अवस्थेत संसारातील दु:ख देणारे सर्व आधीव्याधी गळून पडतात. सर्व उपाधींचा शेवट होणे म्हणजे सहज साक्षात्कार होय.वेदांताचा अखेरचा सिध्दांत हाच आहे. पूर्वपक्ष,उत्तरपक्ष करून सिध्द करणारे निश्चित तत्व म्हणजे आत्माच आहे. सर्व ब्रम्हांडाचे म्हणजे उपनिशदे,ब्रम्हसुत्रे आणि भगवत्□ गीता यांचे प्रमेय आत्मस्वरूपचं आहे. सर्व सिध्द लोकांचा हा अनुभव आहे. अशा प्रकारे चौदा ब्रम्हाचें निरसन आपण या समासात अभ्यासले. उपाधिरहित, केवळ, शुध्दब्रम्ह याचा सारांश पुढील प्रमाणे मांडता येईल. जे शाश्वत ब्रम्ह आहे त्याठिकाणी मायेचा भ्रम नाही, अज्ञान नाही, दृश्याचा स्पर्श नाही, कल्पना नाही. जे पुरूष शुध्द ब्रम्हाचा साक्षात अनुभव घेतात त्यांनाच परब्रम्हाचेस्वरूप कळते. देहाच्या पलिकडे त्यांची अवस्था असल्याने ''मी देह आहे'' ही कल्पनाच त्यांच्या ठिकाणी गौण असते. देहबुद्धी नष्ट झाल्यामुळे त्यांना जिकडे तिकडे ब्रम्ह स्वरूप आहे असे दिसते. देहबुद्धीची कल्पना नाहिशी करण्यासाठी निर्विकल्प बनल्यावर आपण मी पणाचे नसुनसुध्दा आत्मस्वरूपाने अनंतकाळ रहातो.

थोडक्यात काय तर मी म्हणेन देव पहाच पण त्याचे देवत्व आपल्यात कसे येईल हे पहा. तिर्थस्थळी यात्रा करा पूर्वी पेक्षा आता ते सहज शक्य झाले आहे. अत्यंत आधुनिक साधनाद्वारे आपण तिर्थाटन करू शकतो. हा बदल निश्चितच वंदनीय आहे. हारफुले पेढे वाटले ,खुप लाखो रूपयांच्या देणग्या दिल्या तर देवस्थानांचा ऊध्दार होणार यांत शंका नाही. पण त्या देवाचे देवत्व अजूनही आपल्यात यावे असा प्रयत्न करणे ही खरी गरज आहे. जे नि:संग आहे त्याची भेट घेण्यास गेलेला स्वतः नि:संग बनावा तसेच निर्विकल्प, निराकार कल्पने रहित असल्याने त्याची कल्पना करू गेल्यास स्वतः कल्पनाच निर्विकल्प बनते. परब्रम्ह हे एखाद्या दृष्य पदार्थासारखे नाही ते उचलून वस्तुप्रमाणे हातात देता येत नाही. मित्रांनो सद्गुरूंचा सहवास लाभावा,त्यांच्या मुखाने ब्रम्हस्वरूप श्रवण करून आपण त्याचा अनुभव घ्यायचा असतो. आपल्यात देवत्व येऊ द्यायचे असते ही समर्थांची खरी शिकवण आहे. श्रीराम जय राम जय जय राम जय जय रघुवीर समर्थ

चतुर्दशब्रम्हनिरूपण समास तिसरा (दशक सातवे) समाप्त

# परमेश्वराची खरी पूजा



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

देहाभिमान नाहीसा झाला म्हणजे काळजीचे कारण उरत नाही. ' मी साधन करतो ' असा अभिमान देहाभिमानामुळे उत्पन्न होतो. हा साधनाभिमानही घातुक असतो. तेव्हा, जे काही होते ते परमेश्वराच्या सत्तेने होते असे मानीत जावे. आपले हित कशात असते ते त्यालाच उत्तम कळते, आणि तो सर्व तुमच्या बऱ्याकरिताच करीत असतो. तेव्हा कसलीही काळजी करू नये. त्याच्यावर विश्वास टाकून आनंदात असावे. चित्तवृत्ती परमेश्वराकडे लावावी. तेथून ती विषयाकडे जाऊ लागली म्हणजे संधी साधावी; म्हणजे त्यावर लक्ष असावे. मन विषयाकार होऊ लागले म्हणजे माझे स्मरण करावे. बऱ्याच वेळाने आठवण झाली तरी माझे स्मरण करावे, म्हणजे पुढे पुढे लवकर आठवण होऊ लागेल. ज्याचे मन पूजेत असते त्याची खरी पूजा होते. सर्वांभूतीं भगवद्भाव, आणि कोणाचे मन न दुखविणे, ही पूजा खरी होय. पूजेला बाह्योपचाराची गरज नसते. मन मात्र अर्पण होणे जरूर आहे. पूजेत भाव असणे जरूर आहे.

भक्ती आणि वैराग्य यांच्यामध्ये तसा फरक नाही. परमेश्वराची आवड म्हणजे भक्ती, आणि विषयाची अनासक्ती म्हणजे वैराग्य. रामराय वनवासात जायला निघाले तेव्हा त्यांनी सीतामाईला बरोबर न येण्याविषयी सांगितले. त्या वेळी तिने उत्तर दिले की, ' रामा ! तुझ्याबरोबर असेन तर मला सर्व कष्ट सुखमय आहेत; आणि तुझ्याशिवाय असेन तर सर्व सुखोपभोग हे मला कष्टमयच आहेत. ' सीता ही रामाची मोठी भक्त होती, आणि म्हणून तिची अशी अवस्था होती. तिला परिस्थितीची जाणीव नव्हती. पण आपली गोष्ट अशी नाही. आपण एकीकडे परिस्थितीवर अवलंबून आहोत आणि दुसरीकडे आपल्याला भगवंत पाहिजे, म्हणून आपण मध्यम मार्ग धरावा; तो हा की, आपण म्हणावे, ' रामा, माझी परिस्थिती तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे. ' असे आपण मन:पूर्वक म्हटले की परिस्थिती बदलली तरी आपला आनंद टिकेल.

' माझ्या देवाला हे आवडेल का ? ' अशा भावनेने जगात वागणे हाच सगुणोपासनेचा हेतू आहे. जसजशी आपण सगुणाची उपाधी वाढवतो तसतशी आपली इतर उपाधी कमी कमी होत जाते. सगुणाच्या उपासनेला आज आपण कल्पनेने प्रारंभ करू, मागून निश्चयात्मकता आपोआप येईल. चैतन्य सर्व ठिकाणी भरलेले आहे; ते कुठेही प्रकट होऊ शकेल. त्याला प्रकट करणे हे आपल्या भावनेवर अवलंबून आहे. ज्याची भावना खरी शुद्ध, म्हणजे नि:संशय असते, त्याला दगडाची मूर्तिदेखील देव बनते. भावना मात्र शंभर नंबरी पाहिजे; त्यामध्ये भेसळ उपयोगाची नाही.

उपाधी वासना नाहीशा करण्यासाठीच नाम घ्यायचे असते.



श्री संत ज्ञानेश्वर

अभंग व अर्थ

अभंग १५

निजगुजा गूज तो ।
मोहना मोहन तो गे बाई ॥१॥
बोधा बोध बोधविता तो ।
द्वैता-द्वैत अद्वैत तो गे बाई ॥ध्रु०॥
रखुमादेविवरु तो ।
सर्वादि सर्वेश्वरु तो गे बाई ॥२॥

अर्थ:-
तो मोहनाचे मोहन व रहस्याचे रहस्य आहे. बोधाचा बोध देणारा व द्वैताद्वैतातील अद्वैत तोच आहे. सर्वामधिल तोच सर्वेश्वर तोच रखुमाईचा पती आहे असे माऊली सांगतात.

अभंग १६

कांही नव्हे तो ।
अमूर्ता मूर्ति तो गे बाई ॥१॥
सहजा सहज तो ।
सहज सुखनिधान तो गे बाई ॥ध्रु०।
रखुमादेविवरु तो ।
पुंडलिकवरद तो गे बाई ॥२॥

अर्थ:-
हे जीवरुपी सखी, तो काही नसणारा, पण मूर्त अमूर्त असणारा, तोच आहे. सुखनिधान आहे, सहज करणारा तोच आहे व तोच सहजातील सहजत्व आहे. तोच पुंडलिकाला वरदान देणारा रखुमाईचा पती आहे असे माऊली सांगतात.




# तूप खा... निरोगी आयुष्यजगा...

ज्योतिर्मय साहित्य

जेवण कसलेही असो, पंगतीला तूप वाढले कि मगच जेवायला सुरुवात करायची आपली परंपरा आहे, एकंदरीत तूप हा स्वयंपाकघरातला एक अविभाज्य घटक आहे..

तुपः ।। घ्रुतम् आयुः।।, सहस्रवीर्य विधिभिघ्रुतं कर्मसहस्रक्रुत।।

ज्याच्या आहारात थोड्या फार प्रमाणात तुप रोज आहे तो निरोगी आयुष्य दिर्घकाळ जगतो. सर्व प्रकारच्या स्निग्ध पदार्थात तूप हे सर्वश्रेष्ठ आहे. शरिराची दर क्षणाला झिज होत असते, ती भरून यायला शरिरात स्निग्धता लागते.

सात धातूंमध्ये मज्जा हा धातू सर्वात श्रेष्ठ धातू होय. शरिराच्या ठिकठिकाणाच्या कार्यास तुपाची मदत मोठी होते, आयुर्वेदाप्रमाणे तूप हे आयुष्यवर्धक व मधूर रसाच्या पदार्थात श्रेष्ठ आहे, शरिराला तुपामुळे स्थैर्य मिळते, बुद्धि, धारणा शक्ति, स्मरणशक्ति वाढवणे याकरता तूप माफक प्रमाणात रोज घ्यावे.

घ्रुत हे शित गुणांचे असून वात व पित्त विकारात काम करते, अरूची, भूक न लागणे, अग्निमांद्य, या विकारात अग्निवर्धन होते, शीतपित्त, व गांधी उठणे या विकारात, तुपात कालवून मिरेपुड लावली तर अंगाची खाज कमी होते,

आम्लपित्तात, नियमाने सकाळी व संध्याकाळी पंधरा ग्रॅम तूप घ्यावे, स्रियांच्या प्रदर विकारात गुणकारी आहे, क्रूश व्यक्तिने कंबरदुखी, गुडघेदुखी, सांधेदुखी यावर थोडे तुप गरम पाण्याबरोबर घ्यावे,

ज्यांचा कोठा रुक्ष आहे, बद्धकोष्ठ आहे, त्यांनी रोज रात्री एक कप गरम दुधासोबत एक चमचा तूप घ्यावे.

कान सतत वाहणे, कानात आवाज येणे, कान कोरडे पडणे, तसेच डोळे रूक्ष होणे, डोळ्यांचा वाढता नंबर, डोळे लाल होणे, या विकारात सकाळी, वीस ग्रॅम तूप खावे.

उष्णतेने केस गळत असल्यास, केसात खवडे, चाई, फोड होत असल्यास, नियमित तूप खावे, कुरूप या विकारात कुरूप कापण्यापेक्षा, शतघौत तुप तिथे घासावे, बरे होतात. शांत झोपेकरता, तळपायाला, कानशिल, कपाळपट्टि, यांना तूप चांगले जिरवावे.

वात, गुल्म, पोटात फिरणारा वायू गोळा याकरता जेवणाच्या सुरुवातीला तूप चमचाभर खाउन जेवण संपतांना पुन्हा चमचाभर खावे.

शरिरातील कोणतिही जखम भरून येण्यास व आतड्यातील व्रण भरण्यास तुपाचे सेवन गुणकारी आहे..

क्रुश व्यक्तिच्या छातीत दुखणे, क्षयरोग, थुंकीतून रक्त पडणे, कडकी, बारीक हाडे ताप या विकारात नेमाने तुप खावे, बल मिळते. सततची डोकेदुखी, असल्यास नाकपुडीत दोन थेंब तुपाचे टाकावे,

तोंड आल्यास, अल्सर झाल्यास जिभेला तुप चोळावे. त तोंडात तुप धरावे,

त्वचा विकारात , खाज व आग, थांबवण्याकरता, विशेषतः सोरायसिस मद्ये तुप खाणे लाभदायी आहे,

समस्त विषविकारात पोटात घेण्यासाठी तुपासारखा उपाय नाही, विषाच्या दहा गुणाविरूद्ध लढा देण्यास तुपाचे दहा गुण आहेत, चुकिच्या औषधांचे परिणाम डोळ्यावर, त्वचेवर, केसांवर, किडनीवर, झाल्यास , सकाळी तूप घ्यावे.

फिटस् येणे, आकडी, विस्मरण, उन्माद, या वातविकारात, पोटात तूप घ्यावे, तळहात, पाय, कानशिले, यांना तूप घासावे, लकवा, तोंडावरून वारे जाणे, तोंड वाकडे होणे, या विकारात, नाकात दोन थेंब तुप टाकावे, डोळ्यात टाकावे.

**(क्रमशः)**

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९



लघु बोधकथा

◆अहंकारी राजाला धडा◆

एक अहंकारी राजा होता. त्याला आपल्या ऐश्वर्याचा आणि राज्याचा गर्व होता. तसेच आपली शक्ती आणि रूपावरही तो अहंगंड बाळगून असायचा. आपल्या बुद्धीचा टेंभा मिरवायचा. युद्धात जय मिळाला की त्याला गर्व चढायचा. आपल्यासमोर तो इतरांना तुच्छ लेखत असे. कोणाचा मुलाहिजा न बाळगता त्याचा तो अपमान करत असे. दुस-याला कमी लेखण्याचा त्याचा प्रयत्न असायचा. या कारणांमुळे लोक त्याच्यावर नाराज असायचे. त्याच राज्यात एका विद्वान पंडीताने त्याला वठणीवर आणण्याचे ठरविले. एके दिवशी तो पंडीत राजाच्या दरबारात गेला आणि राजाला प्रणाम केला. राजाने उद्दामपणे प्रतिनमस्कारही केला नाही उलट त्याने पंडीताला गर्वाने विचारले,''बोला पंडीत महाराज, तुम्हाला काय मदत पाहिजे. काय मागायचे असेल ते मागून घ्या, दान पाहिजे असेल तर दान घ्या किंवा धन पाहिजे, सोनेनाणे, जमीन, धान्य जे काही मागायचे ते तुम्ही माझ्याकडून मागून घ्या'' पंडीतजीने राजाकडे एकवार पाहिले व तो मोठमोठ्याने हसू लागला. राजाला व दरबारातील लोकांना पंडीताच्या हसण्याचे कारण काही कळेना, हसण्याचा भर ओसरल्यावर पंडीत म्हणाला,''राजन, तुम्ही मला काय दान देणार कारण तुमच्याकडे मला देण्यासारखे काहीच नाही.'' पंडीताचे हे बोलणे ऐकताच राजा संतापून लालबुंद झाला,

क्रमश:......

# नातं (भाग ५)

ज्योतिर्मय साहित्य

घाबरलेल्या अर्चनाला काय करावे? सुचेना झाले. डॉ जोशी ही बाहेर येत नव्हते

अर्चनाच्या मनात नाना शंका येऊ लागल्या.

ती खुर्ची वरून उठून जवळच असलेल्या रात्रपाळीवर असलेल्या मदतनीस कर्मचाऱ्याला विचारायला गेली. तो म्हणाला,ताई काळजी करू नका, कधी कधी होतं असं. लाल लाईट लागला म्हणजे पेशंटची नाडी कमी जास्त होत असते., असे डॉ. नी मला मागेच सांगितले होते.

प्रत्येक वेळी खूप धोका आहे, असं नसतं. कृपया तुम्ही शांत रहा. नक्की चांगले होईल.

अर्चना पुन्हा खुर्चीवर येऊन बसली. लाल लाईट चालूच होता. ती डोक्याला हात लावून.बसली होती. रात्रीचे तीन वाजून गेले होते, आणि डोक्याला हात लावलेल्या अवस्थेत, शरीर थकल्याने तिला काही क्षण डुलकी लागली पण लाल लाईट पीपी वाजला, त्यामुळे ती पुन्हा जागी झाली, आणि तो बंद झाला.

याचा अर्थ काय असावा? हा विचार ती करत असतानाच डॉ जोशी तेथून बाहेर आले, ते थेट अर्चनाकडे. ते अर्चनाला म्हणाले, काळजी नका करू, तुम्ही वेळेवर केलेली धावपळ कामी आली आहे. डॉ देशमुखांच्या प्रयत्नांना यश आले



आहे. आनंद आता हळूहळु स्टेबल होतील. त्यांची अँजिओप्लास्टी झाली आहे, आणि त्यांचा पूर्ण धोका टळला आहे त्यांना आता छान झोप लागली आहे, तुम्ही ही थोडा आराम करा.

मी ही रेस्ट रूम मध्ये आराम करतो.डॉ देशमुख, आनंद वर लक्ष ठेवून आहेतच.

हे ऐकून अर्चनाला थोडं हायसे वाटले. मनातल्या मनात तिने देवाचे आभार मानले व काही तरी विचार करतच तेथेच बसल्या बसल्या तिला झोप लागली.

बघता बघता सकाळ झाली, खिडकीच्या जाळीतून येत असलेल्या गार हवेने अर्चनाला जाग आली.तिने घड्याळाकडे बघितले साडे सहा वाजले होते.

इतक्यात तेथील मदतनीस कर्मचारी बाहेर आला व त्याने अर्चनाला सांगितले की रुग्ण शुद्धीवर आला आहे व तुम्ही त्यांना आता भेटू शकता.फक्त दहा पंधरा मिनिटे बोलण्याची परवानगी आहे.

अर्चनाला खुप आनंद झाला. ती त्वरित आनंद असलेल्या रूम मध्ये गेली. आनंदकडे आनंदाने पाहत आनंद, तुम्ही आता ठीक आहात, असे म्हणाली.

आनंदने तिचा हात हातातघेतला, अर्चना, मला रात्री एकदम गरगरल्या सारखे झाले होते, छातीत जडपणा जाणवत होता आणि मग चक्कर आली. व पुढे काय झाले काहीच आठवत नाहीं.

तेंव्हा अर्चना म्हणाली, तुम्हाला जास्त बोलायचे नाही. तुम्ही शांत रहा. आता सगळे नीट होईल.



गिरीश खं. वसेकर, पुणे
94226 59400

अर्चनाचे हे बोलणे ऐकून आनंदच्या डोळ्यात थोडे पाणी आले,अर्चना काल नसती तर आपले काय झाले असते?

हा विचार त्याचा मनात आला.

अर्चना, म्हणाली, आनंद तुम्हाला आता, सात वाजता थोडा चहा आणि बिस्कीट देण्याची परवानगी आहे असे येथील पेपरवर लिहून ठेवले आहे. मी ऑर्डर देऊन येते.

अर्चनाने तेथेच असलेल्या कॅन्टीनमध्ये जाऊन ऑर्डर दिली. पाच मिनिटात स्वतःही माऊथ वॉश करून आली. दहा मिनिटात दोन कप चहा, व बिस्कीट आनंद यांच्या रूम मध्ये आले.

अर्चनाने आनंद यांना सावकाश उठवून चहा व बिस्कीट दिले. स्वतः ही चहा घेऊ लागली.

वाफाळलेल्या चहातून येत असलेल्या वाफांच्या मधून चहाचा घोट घेत असताना आनंदने अर्चना कडे कटाक्ष टाकला, हे कोणते नाते म्हणावे? या विचारात...

# संध्यामग्न कवितेचे शब्दश्वास

ज्योतिर्मय साहित्य

सायंकाळ. संधी-प्रकाशाची वेळ. आल्हाद हळुवार स्पर्श व्हावा अशी हवा. हवेत थोडासा गारवा. त्यातच सुखावणारा तुझा आभास. माझ्यासाठी तुझा आभास सुद्धा सत्यच. कारण तुझ्या नसण्याच्या सत्याला मन स्वीकारत नाही. अशातच तुझ्या काव्यमय अस्तित्वाचा भास होतो, अंग अंग शहारते. वाटतं सोबत आहेस. वाटतं दूर नाहीस.मी दोन्हीचा अस्वीकार करु शकत नाही. कारण कविता सोबत असतेच. आणि तुझं रूप ही काव्यमय. म्हणूनच मी एकटा कधीच नसतो.

तू नसताना तुझ्या काव्यमय स्वरूपात प्रतिभा खुलते. तु असतानाच पानावर न उमटलेल्या कवितेच्या ओळींची अदृश्य बांधणी झालेली असते.


तुझ्या सहवासाचा गंध
होऊन जातो श्वास
सावलीला सोबतीचा
असतो तोच विश्वास

थंड हवेच्या झुळूकेसरशी उमलत्या कळी समान अलगद उमललेल्या तुझ्या ओठातून सुवासासमान आलेल्या शब्दांनी माझ्या देहात चैतन्य बहरले होते. जाई जुईच्या वेलीला बहर यावा, शेकडो फुलांच्या चांदण्याने हृदयावर अबाधित सत्ता गाजवावी तसे तुझे अविरत स्फुरणारे बोल मनभावन असेच.

गुलाबी चेहऱ्यावर
ओठांच्या पाकळ्या
उमलून बहरल्या
शब्दांच्या कळ्या

परत परत वाटते. पुन्हा पुन्हा तोच तो विचार, अशीच उमटते कां कविता? नीरव संध्या समयी ती शब्द फुलांची बहरलेली वेल कविता होऊन अंगभर शहारली. त्यातील काही नाजूक शब्दफुले मी अलगद ओंजळीत स्वीकारून हृदयाच्या कप्प्यात सोपवली.

शब्दांची फुलं
हृदयाला भावली
अलगद बिलगते
सावलीला सावली



बलराज संघई
छत्रपती संभाजीनगर मो. 9420015108

कविता अशीच येते. स्पर्शाच्या आल्हादातून हळुवारपणे बहरते. ती केव्हां माझी होते ही वेळ मात्र सांगता येत नाही. गंधीत अणु रेणूंनी व्यापलेल्या आभाळागत कळीच्या उमलत्या काळजातून आलेल्या सुरेल स्वरांचे गाणे. होय! त्याच आलापाने नख शिखांत व्यापतो देह अन् मनाच्या पटलावर उमटतात शब्दफुले.

श्वासातले स्वर, उमललेले शब्द गुलाबी साज शृंगारात पैंजणाच्या मधुर लयबद्ध नजाकतीत समोर येऊन उभारतात काव्य देवीच्या स्वरूपात. तीच तर असते माझी कविता.

ती जात नाही. तिची इच्छा असली तरी जावू शकत नाही. कविता सतत असते सभोवताली. हवेत, फुलात, निसर्गात, प्राणात श्वासात, हृदयात खोलवर.

परत असेच अनुभवलेले काव्यात्मक क्षण, हळुवार आल्हाद देऊन जाणारा दिवस सरतो, क्षितिजाच्या उंबरठ्यावर सांज येऊन अस्तित्वाची जाणीव देते माझ्यात भिनलेल्या माझ्याच कवितेची.

सायंकाळी संधीप्रकाशात
अडकत हुडकत फिरताना
आजही गवसतो मला
गाण्याचा सूर
अन् कवितेचा धागा.

***






# तिरुपती बालाजी

ज्योतिर्मय साहित्य

मंगापुरमचे जुने बालाजी मंदिर

भगवान व्यंकटेश्वर तिरूमलावर अंतर्धान पावल्यानंतर बालाजींचा मंगापूर येथे वास काही काळ राहिला. बालाजी काही काळ तिरुमलावर न राहता श्रीनिवास मंगापुरम येथे कल्याण व्यंकटेश्वर रूपात प्रकट झाले तेथे त्यांनी पद्मावती देवी सोबत सौम्य गृह स्वरूपात दर्शन दिले म्हणून या मूर्तीला कल्याण व्यंकटेश्वर म्हणजे विवाहोत्तर प्रसन्न बालाजी असे म्हटले जाते.

नारदमुनींची भुमिका

नारद मुनिंनी पाहिले की तिरूमला वरील बालाजी अत्यंत गंभीर व मौन अवस्थेत आहेत. भक्तांच्या कल्याणासाठी त्यांनी बालाजीला विनंती केली. त्यावर बालाजींनी मंगापूर येथे सौम्य रूपात वास करण्यास संमती दिली. मंगापूर येथील बालाजी हा गृहस्थ, दान स्वीकारणारा, आणि भक्तांच्या सांसारिक अडचणी सोडवणारा मानल्या जातो. यामुळे विवाह, संतती, आर्थिक अडचणी साठी जुने बालाजी मंदिर दर्शन विशेष फलदायी मांडले जाते.

निलादेविची कथा

श्री वैष्णव तत्त्व ज्ञानानुसार भगवान विष्णूंच्या तीन प्रमुख शक्ती (देवी) आहेत.

१) श्रीदेवी किंवा महालक्ष्मी वैकुंठातील ऐश्वर्य व कृपा. २) भूदेवी क्षमा धैर्य व धरित्री. ३) नीला देवी करुणा वात्सल्य आणि प्रेमस्वरूप भक्ती.

या नीला देवीला अनेक ग्रंथात लिला शक्ती, करुणा शक्ती व अनन्य भक्तीचे प्रतीक मानले आहे. तिरू मलाच्या अरण्यात निल नायिका किंवा नीलम्मा नावाची एक गोप कन्या राहत होती. ती अत्यंत सुंदर, निष्पाप आणि भगवान श्रीनिवासावर एकनिष्ठ प्रेम करणारी होती. तिचे जीवन म्हणजेच भगवंताची सेवा. तिला ऐश्वर्य मान सन्मान यांची अपेक्षा नव्हती. फक्त श्रीनिवास माझे सर्वस्व अशीच तिची भावना होती. श्रीनिवास म्हणजेच भगवान व्यंकटेश्वर अरण्यात वावरत असताना नील नायकी ने त्यांची निस्वार्थ सेवा केली. त्यांना फळे कंदमुळे अर्पण करणे, त्यांच्यावर संकट आले की धाव घेणे. ही सेवा पाहून भगवान तिच्या भक्तीवर प्रसन्न झाले. एकदा अरण्यात शिकार करताना त्यांनाच बाण लागला. त्या जखमेवर औषधासाठी केसांची गरज होती. नील नाईका हिने क्षणाचा ही विलंब न करता आपले लांब सडक केस कापून त्याने भगवंताची जखम बांधली. ते पाहून भगवान भावूक झाले. तुझे प्रेम अमर आहे. कलियुगात माझ्या प्रत्येक भक्ताच्या केस दानात तुझा अंश राहील. याच घटनेतून तिरुमलातील मुंडन म्हणजेच केस अर्पण परंपरा सुरू झाली. भगवंताने नीला देवीला असा वर दिला की तू माझी नित्य सहचरनी होशील. माझ्या वक्ष स्थळावर श्री वत्स चिन्हात तुझा सदैव वास राहील. कलियुगात तुझे नाव नीला देवी असेल. अशा प्रकारे निल नायिका नीलादेवी किंवा नीलम्मा झाली. तिचे मंदिर तिरुपती पासुन जवळच एका टेकडीवर आहे.

दर्शनाचा क्रम- तिरुपती व तिरूमला येथे असंख्य मंदिरे आहेत, पण एका विशिष्ट क्रमाने येथील दर्शन घ्यावे अशी मान्यता आहे.

आधी जुने बालाजी दर्शन. मग पद्मावती देवी तिरुचाणुर येथील मंदिराचे दर्शन. यानंतर गोविंदराज स्वामी यांचे तिरुपती येथील मंदिराचे दर्शन. त्यानंतर तिरुमला येथील वराह स्वामी यांचे दर्शन आणि मग शेवटी भगवान व्यंकटेश्वर बालाजी यांचे तिरुमला वरील दर्शन असा क्रम पाळावा अशी मान्यता आहे.

तिरुमला येथिल विविध उत्सव

१) ब्रम्होत्सव

सप्टेंबर ऑक्टोबर या काळात हा सर्वात मोठा उत्सव साजरा होतो हा नऊ दिवस चालतो ब्रह्मदेवाने स्वतः श्रीनिवास यांचे साठी हा उत्सव सुरू केला म्हणून याला ब्रह्मोत्सव म्हणतात दररोज वेगवेगळ्या वाहनांवर श्री बालाजींची मिरवणूक असते ध्वज वाहन, हंस, सिंह, गज, गरुड, अश्वरथ अशी वाहने असतात. गरुड सेवा ही पाचव्या दिवशी रात्री सर्वात पवित्र मानली जाते. शेवटच्या दिवशी रथोत्सव चक्र स्नान असते. अशी मान्यता आहे की, हा सोहळा पाहण्यासाठी पृथ्वीवर प्रत्यक्ष देवता अवतरीत होतात. **(क्रमशः)**









## विक्रम वेताळ आणि डायरेक्ट मार्केटिंग

*काही पाऊले चालून गेल्यानंतर विक्रमाने मौन सोडले आणि तो म्हणाला "वेताळा, ग्राहकांची दिशाभूल होऊ नये म्हणून कंपन्यांनी व नियंत्रकांनी डायरेक्ट मार्केटिंग ही संकल्पना आणली. विक्रेत्यांनी ग्राहकांना योग्य उत्पादने विकली असती तर कदाचित हे डायरेक्ट मार्केटिंग वगैरे सुरू झाले नसते,*

*विक्री वाढावी आणि ग्राहकाला गरजेप्रमाणे योग्य दर्जाचे हवे तेच उत्पादन मिळावे म्हणून नियंत्रक (Regulator) हे बदल करत असतात.*

*विम्याच्या खाजगीकरणा पूर्वी केवळ एजंटामार्फत विमा विकल्या जात होता. हा एजंट पुरेसा सक्षम असण्याची गरज तेव्हाच्या कंपनीला वाटली नसावी पण खाजगीकरणानंतर नियंत्रकाला तशी गरज वाटली व तसे बदलही करण्यात आले.*

*हल्ली बँकांमधून सुद्धा आयुर्विमा, म्युच्युअल फंड,क्रेडिट कार्ड, साधारण विमा ही उत्पादने विकली जाऊ लागली आहेत.*


*शिवाय ब्रोकर्सना पण ही सर्व उत्पादने विकण्यासाठी परवानगी मिळाली.*

*या सर्व गोष्टी नियंत्रकांनी ग्राहक केंद्रस्थानी ठेवून केल्या होत्या. म्हणजेच ग्राहकाचे हित व्हावे असा हेतू त्यामागे होता. या सर्व गोष्टींमुळे ग्राहकाचे हित नक्कीच झाले आहे.*

*ग्राहकापर्यंत ही उत्पादने पोहोचली आहेत. ग्राहकाचे उद्बोधन झाले आहे. ग्राहकाचे ज्ञान वाढून ग्राहक जागरुक झाला आहे.*


*पण वेताळा म्हणतात ना, कि नाण्याला दोन बाजू असतात. वर सांगितली ती पहिली बाजू.*

*क्रमशः ........*









# मूल्यशिक्षण काळाची गरज

ज्योतिर्मय साहित्य

मी इयत्ता पहिली ते चवथीला शिकवते. एकदा मी उशिरा आलेल्या मुलांना दहा उठाबशा काढण्याची शिक्षा दिली. त्यानंतर दहा मिनिटांनी अभय आला. त्याला काल ताप होता आणि त्याचे हातपाय दुखत होते असे त्याच्या आईने मला फोन करून सांगितले होते त्यामुळे मी त्याला कोणतीही शिक्षा न करता जागेवर बसायला सांगितले. तर ते वर्गातल्या अयान ला सहन झाले नाही तो लगेच म्हणाला,

''टीचर आपने हमे पनिशमेंट दी, और अभय को कुछ नही बोला.'' मी म्हटलं, ''अरे त्याला बरं नाही म्हणून त्याला शिक्षा केली नाही.'' ''पर वो भी तो देर से आया, उसका क्या ?''

त्यावर मी त्याला समजावलं, आणि त्याला शिक्षा का केली नाही हे पण स्पष्ट करून सांगितले. पण आतून मी विचार करू लागले, अयानचा हा प्रश्न काही चुकीचा नव्हता. तो त्याच्या मनात येणे सहाजिकच होतं. पण त्याची विचारण्याची पद्धती काही त्या विद्यार्थ्याला साजेशी नव्हती. बोलण्यात अरेरावकी होती. वर्गमित्राबद्दल जे प्रेम आणि आपुलकी असायला हवी ती संपली की काय असे मला वाटले. आजचे लहान मुलं सुद्धा इतके जागरूक आहेत की स्वतःवर अन्याय होत आहे असे वाटले तर ते लगेच जाब विचारतात. ते जाब विचारणे किंवा त्यांच्या मनात आलेल्या प्रश्नाचे उत्तर जाणून घेणे अगदी साहजिक आहे. पण त्याची दुसरी बाजू अशी सांगते की मुलांमध्ये सहानुभूतीचा अभाव निर्माण झालेला दिसतो. पूर्वी एकमेकांबद्दल आपुलकी असायची, आपुलकीचा आणि प्रेमाचा तो ओलावा दिवसेंदिवस सुकत चालला आहे त्यामुळे दुरावा निर्माण झाल्याचे चित्र उमटते. विद्यार्थ्यांमध्ये वाढती असंवेदनशीलता आणि सहानुभूतीचा अभाव ह्या सुद्धा समाजाला घातक ठरणाऱ्या बाबी आहेत.



आजच्या पिढीमध्ये धैर्य नाही. त्यांना कोणतीही गोष्ट चटकन (फास्ट) पाहिजे. एका मिनिटात पाच ते सहा रील बघणारी ही पिढी अधीर झाली आहे. त्यामुळे कधी कधी ते समोरच्या व्यक्तीबद्दल पटकन तर्क करतात म्हणजे त्या व्यक्तीबद्दल निर्णय घेऊन मोकळे होतात. आज मुलांमध्ये चिकाटी कमी झालेली दिसून येते. एखादी गोष्ट मला जमत नाही असे म्हणून पटकन मोकळे होतात. हे सुद्धा त्यांच्यातील अधीरता स्पष्ट करतात. त्यांची हात झटकून दूर व्हायची प्रवृत्ती कधीकधी चिंतन करायला प्रवृत्त करते.

त्यांच्यातील अनुकरणाचा गुण कमी होत चालला आहे शिक्षक जसे सांगतात तसेच अंगीकारण्याची वृत्ती कमी झाली आहे. शिक्षकांनी सांगितलेल्या पायऱ्या फॉलो करत नाहीत. त्यांना वरवर माहिती मिळवून कुठेतरी ॲडमिशन मिळवण्यासाठी फक्त मार्क्स मिळवायचे असतात. त्यांची सखोल ज्ञान मिळवण्याची वृत्तीही फार कमी झाली आहे, त्यामुळेही ते शिक्षकांशी जुळू पाहत नाहीत. मुलांमधील श्रमप्रतिष्ठा कमी झाली आहे. पूर्वी शाळेत मैदान स्वच्छ करायचे म्हटले तर आपली वानरसेना काही मिनिटात ते काम करून टाकायची पण आज मुलं काम करणे कमीपणाचे समजतात. तेच घरात घडते. आपल्याच घरातील दळण आणणे किंवा कचरा नेऊन टाकणे ही कामे मुलांना कमी दर्जाची वाटतात..

ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते ही वृत्ती कमी झाली आहे. स्पर्धा इतकी वाढली आहे की सोबतच्या व्यक्तीला सहकारी समजण्यापेक्षा स्पर्धक म्हणून वागणूक दिली जाते. ही आजच्या पिढीची शोकांतिका आहे. आमचे चौथी-पाचवी चे मुलं शिक्षकांना निक्षुन सांगतात, ''सर याला समजावून सांगा! मी काही केलं नाही तरी हा आधी मला चिडवतो. मग मी याला मारलं तर मला काही म्हणू नका.''

ही तर शिक्षकाला जवळजवळ धमकीच आहे. मुले असे शिक्षकांना बोलतात त्याचे कारण काय? तर घरात आई-वडील शिक्षकांबद्दल आदराने बोलत नाहीत. खाजगी शाळा विद्यार्थ्यांकडून आडमाप फी घेते, त्यामुळे त्यांच्या नजरेत शिक्षकांची किंमत राहिली नाही. ॲडमिशन मिळाव्या म्हणून प्रायव्हेट कॉन्व्हेंट मध्ये हे विद्यार्थी शाळेच्या डोक्यावर असतात. फी भरतात म्हणून पालकही तोऱ्यात असतात. सरकारी शाळेची परिस्थिती काही फारशी वेगळी नाही. तिथे शाळांना ॲडमिशन मिळत नाहीत. दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्याला सरकारकडून सर्व सुविधा तर मिळतातच पण शिक्षकही विद्यार्थी टिकावे म्हणून विद्यार्थ्यांवर खूप खर्च करतात. कारण दुर्दैवाने आजही समाजात असा एक वर्ग आहे की जिथे शिक्षणापेक्षा शाळेत फुकट काय मिळते याला महत्व देणारे पालक आहेत. त्यांनाही शिक्षकांबद्दल आपुलकी, प्रेम नाही. कारण आपले शिक्षण ही शिक्षकांची जबाबदारी आणि गरज आहे असे ते समजतात. त्यामुळे त्याही शिक्षकांबद्दल फारसे प्रेम समाजात नाही. अशा प्रकारे शिक्षक कोणताही असो तो समाज आणि विद्यार्थ्यांच्या आदराला पोरका झाला आहे. आणि सामाजिक स्तर कोणताही असो, त्यांची मुलं जीवन मूल्यापासून दूर झाली आहेत.

खाजगी शाळेतील शिक्षण हे पैशाने आपण खरेदी करत आहोत हा भाव श्रीमंत पालकांमध्ये असल्यामुळे पाल्याची तीच प्रोग्रामिंग झाली आहे. जिल्हा परिषद आणि नगरपरिषद मध्ये शिकणाऱ्या मुलांच्या पालकांना तर असे वाटते की आपले मुलं यांच्या शाळेत आहेत म्हणून यांच्या नोकऱ्या टिकून आहेत. त्यामुळे मुलांमध्ये जी जीवनमूल्ये पाहिजे ती दिसत नाहीत. पूर्वी ही मक्तेदारी शाळेने सांभाळली, पण आज पालकांचे त्यासाठी पाहिजे ते सहकार्य मिळत नाही, असा प्रत्यय येतो. परिणामी सर्वच स्तरातील विद्यार्थ्यांमधील जीवन मूल्यांचा ऱ्हास झाला आहे असे निदर्शनास येते. अगदी १००% विद्यार्थी आणि १००% पालक असे आहेत असेही नाही पण त्याचे प्रमाण चिंताजनक आहे एवढे मात्र नक्की!

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मूल्यशिक्षण स्वतंत्रपणे अमलात आणले. जून १९९७ पासून मूल्यशिक्षण महाराष्ट्र शासनाने अनिवार्य केले. आणि गेल्या काही वर्षांपासून पुणे येथील ''शांतीलाल मुथा फाउंडेशन'' या स्वयंसेवी संस्थेने शाळेत विद्यार्थ्यांसाठी ''मूल्यवर्धन'' हा कार्यक्रम आखला आहे. विद्यार्थ्यांमध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता हे मूल्य रुजावे आणि पुढे भारताचा आदर्श नागरिक म्हणून या मूल्यांचा समाजासाठी त्याने वापर करावा हा हेतू या कार्यक्रमा मागचा आहे. या फाउंडेशनने अतिशय स्तुत्य असा हा कार्यक्रम राबवणे सुरू केले आहे. ही जीवनमूल्ये बालकांमध्ये अगदी लहानपणापासून रुजावी म्हणून त्यांनी इयत्ता पहिली पासून शिक्षक उपक्रम पुस्तिका व विद्यार्थी उपक्रम पुस्तिका तयार केली आहेत. याची विद्यार्थ्याला सुजाण नागरिक बनायला मदत नक्की होणार, परंतु त्याआधी तो आदर्श विद्यार्थी होणे



अर्चना ठाकरे मोरे
मूर्तिजापूर, मो. 96374 29655

आवश्यक आहे ना! शाळा, शिक्षक आणि सामाजिक संस्था तर आपले प्रयत्न करतच आहेत, परंतु शाळेला पूरक असे मूल्यशिक्षण घरून सुद्धा द्यायला हवे.

शिक्षण मिळण्याचे कितीही मार्ग किंवा स्त्रोत उपलब्ध असले तरी प्रत्यक्ष शिक्षकाकडून जे ज्ञान प्राप्त होते त्याला अजूनही या आधुनिक युगातही तोड नाही. विद्यार्थ्याच्या जवळ बसून, त्याच्या पाठीवर हात ठेवून, त्याच्या डोळ्यात पाहून जी शिकवण शिक्षक देतो ती त्याच्या मेंदू पटलावर कायमची कोरली जाते. म्हणून पालक वर्गाने सुद्धा शिक्षकाचा आदर केला तर मुलांसमोर त्याचा आदर्श घातला जाईल. आज तो शिक्षकांसमोर तो असा अरेरावकीने बोलत असेल तर भविष्यात याच परिस्थितीला पालकांना सुद्धा सामोरे जावे लागेल यात शंका नाही. कारण कोणतेही संस्कार आपण आपल्या कृतीतून दिले तर वेगळे शिकवायची गरज पडणार नाही. आज ट्युशन क्लासेसच्या समोर मुलं बेधडक शिक्षकांची एकेरी नाव घेताना दिसतात. शैलेश के बॅच के लिए आता है, की विना की केमिस्ट्री की टेस्ट देता है? असे संवाद कानावर पडतात म्हणून अभ्यासाव्यतिरिक्त इतर संस्कारांची नितांत गरज आपल्या पाल्यांना आहे. मुलांच्या चारित्र्यामध्ये नम्रता, सौजन्यशीलता, प्रामाणिकपणा आणि संवेदनशीलता ही मुल्ये रुजली तर श्रमप्रतिष्ठा, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, स्त्री-पुरुष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्वधर्म सहिष्णुता, राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रीय एकात्मता ही मूल्ये वेगळी रुजवावी लागणार नाही. ती आपोआपच रुजली जातील. शिक्षकही माणूस आहे तोही चुकू शकतो त्यामुळे पालक किंवा समाजाने एकदम त्याच्या अंगावर न येता त्याच्याशी चर्चा करून तोडगा काढायला हवा. विद्यार्थी जसा पालकाच्या जीवनाचा अविभाज्य श्वास आहे तसाच तो शिक्षकांच्या व्यवसायरूपी आयुष्याचा आत्मा आहे म्हणूनच तो दोघांसाठीही तितकाच महत्त्वाचा आहे.

# अक्षर वैभव साहित्य परिषदेतर्फे शनिवारी ''वाण कवितेचे'' कार्यक्रम, काव्य संवाद, कवयित्रींचे कविसंमेलन

ज्योतिर्मय साहित्य

जालना - जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद आणि अक्षर वैभव साहित्य परिषद जालना यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रमाता, राजमाता माँ. जिजाऊ यांच्या जयंती निमित्त शनिवारी ( ता.१७) सायंकाळी ०६.०० वा. मराठा सेवा संघाच्या सभागृहात ''वाण कवितेचे'' अंतर्गत कवी अशोक पाठक यांच्या कवितांवर काव्य संवाद आणि निमंत्रितांचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ.शशिकांत पाटील, सचिव डॉ. राज रणधीर यांनी दिली.




प्रा. डॉ. उद्धव थोरवे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या काव्य संवाद कार्यक्रमास भाष्यकार प्राचार्य भगवान दिरंगे, भावकवयित्री मसापच्या केंद्रीय संचालिका डॉ. संजीवनी तडेगावकर, प्रा.डॉ.यशवंत सोनुने यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

काव्य -संवादानंतर आशा डांगे ( छत्रपती संभाजी नगर) यांच्या अध्यक्षतेखाली तसेच अंजली दिक्षित यांच्या प्रमुख उपस्थितीत निमंत्रित कवयित्रींचे कवी संमेलन होणार आहे.यात माधुरी चौधरी, सविता करंजकर, जयश्री पवार -राठोड, सविता लोंढे , सुनिता कपाळे ,रेणुका तांदूळजे, अनुराधा वायकोस, शुभांगी कुलकर्णी, विद्या दिवटे ,रेखा गतखणे, रत्नमाला मोहिते, वैशाली फोके ,छाया वाघ, स्वाती रत्नपारखी, बेबीताई खेडकर, ज्योती आडेकर ,मथुरा देशमुख, मानसी नाथ्रेकर, शीतल भोसले, सुचिता पाटील यांच्या रचना सादर होतील सूत्रसंचालन डॉ. अर्चना ढेरे या करणार असून साहित्य रसिकांनी मोठ्या संख्येने या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. शशिकांत पाटील, सचिव डॉ.राज रणधीर, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष संतोष मिसाळ यांनी केले आहे.



# डॉ.राज रणधीर यांच्या दत्तक कथेला पुरस्कार

ज्योतिर्मय साहित्य

जालना - प्रगतिशील साहित्य संमेलन, छत्रपती संभाजी नगरच्या वतीने आयोजित खुल्या कथा लेखन स्पर्धेत जालना शहरातील गझलकार,लेखक डॉ.राज रणधीर लिखित ''दत्तक'' कथेस उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले आहे.


स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र असे पारितोषिकाचे स्वरूप असून प्रगतीशील साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ . सुधाकर शेंडगे, मराठी संशोधन केंद्र प्रमुख डॉ.दत्तात्रय डुंबरे , प्रशांत मोरे, समाधान इंगळे यांच्या हस्ते पारितोषिक देउन डॉ.राज रणधीर यांचा गौरव करण्यात आला.या यशाबद्दल रेखा बैजल, डॉ.शशिकांत पाटील,कवी कैलास भाले, कथाकार डॉ.प्रभाकर शेळके, डॉ.ज्योती धर्माधिकारी, गणेश खरात, अशोक खेडकर,मनीष पाटील, रेखा गतखणे, स्वाती रत्नपारखी यांच्या सह आदींनी अभिनंदन करत डॉ.राज रणधीर यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# आचरणात आणण्यासारखे खूप काही

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

मग श्री तुळजाभवानी मातेने सुध्दा त्याचप्रकारे त्याच्याशी युध्द आरंभिले आणि अनेक दिवसांनंतर देवीने त्याला आकाशात गरगर फिरवून जमिनीवर आपटले तेव्हा,त्या महाभयंकर, अजस्त्र राक्षसाचा अंत झाला. सर्व देवांनी मग, स्वर्गातून श्रीजगदंबामातेवर पुष्पवृष्टी केली. तिचा जयजयकार केला. म्हणून, श्रीजगदंबामातेचे नाव महिषासुरमर्दिनी म्हणून विख्यात झाले. श्रीतुळजाभवानी देवीने तिच्या भक्तांना सांगितले की, जेव्हा जेव्हा या धरेवर अधर्म वाढेल तेव्हा तेव्हा प्रगट होवून अधर्मी लोकांचा, दूष्टांचा नाश करेन असे श्रीजगदंबामातेने तिच्या भक्तांना सांगितले आहे. प्रत्येक युगात आणि प्रत्येक शतकात श्रीतुळजाभवानी माता कोणत्याही रुपात भक्तांच्या मदतीला धावून येते. त्यासाठी, श्रीजगदंबामातेवर भक्तांची खूप गाढ श्रध्दा असायला पाहिजे. श्री तुळजाभवानी मातेची अंतर्मनाने एकनिष्ठपणे भक्ती केली पाहिजे.



लेख व काव्यरचना
मधुकर निलेगावकर, पुणे
९४२१३७५६९१

हे जगदंबामाते ! या पृथ्वीतलावर भारतदेशी

कलियुगातील एकविसाव्या शतकातील राक्षसांहूनही क्रूर अशी दूष्कृत्ये करणारी माणसाच्या रुपातील मनुष्यदैत्यांनी जगात, भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात खूप खूप हाहा:कार माजवला आहे. लहान मुलेमुली, महिला यांच्यावर कांही मनुष्यरुपी दूष्ट दैत्य खूप अनन्वित अत्याचार, बलात्कार करीत आहेत.त्यामुळे,सर्वसामान्य महिला, मुलेमुली व जनता व तुझे भक्त खूप भयभीत झाले आहेत. त्यांचा वाली कोणीही राहिलेला नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यकारभार सांभाळणा-या शासनाचा, शासकीय यंत्रणांचा गुन्हेगारांवर, दूष्ट शक्तींवर वचक राहिलेला नाही. त्यामुळे, रोज या



महाराष्ट्रप्रांती, या देशात व जगात निरनिराळ्या गुन्ह्यांचे व गुन्हेगारांचे प्रमाण वाढतंच चालले आहे. याला धरबंद, पायबंद राज्यशासनही घालू शकले नाही. हे जगदंबामाते तुझ्याशिवाय या दूष्ट, महाक्रूर मनुष्यदैत्यांचा वध कोणीही करु शकत नाही. म्हणून, हे जगदंबामाते! तुझ्याचरणी माझे व तुझ्या सर्व भक्तांचे साष्टांग दंडवत आहे . या पृथ्वीतलावर अनेक देशांमध्ये व भारतदेशी विशेषतः महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात जंगलकटाई झालेली आहे. तसेच, होत आहे. तसेच, सर्व प्रकारच्या वाहनांच्यामधून निघणा-या प्रदूषित धूरांमुळे फार मोठ्या प्रमाणात अतिभयानक प्रदूषण झाले आहे. व त्यांचे प्रमाण सातत्याने वाढतच चालले आहे. हे जगदंबामाते त्यामुळे, संपुर्ण विश्वातील मनुष्यांचे जीवन, निसर्गसृष्टी व पृथ्वीचे पर्यावरण संतुलन अस्थिर झालेले आहे. त्याकारणाने विश्वाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. करिता हे जगन्माते, जगदंबामाते तुझ्या सर्व भक्तांचे व सर्वसामान्य जनतेचे, संपूर्ण निसर्गसृष्टीचे रक्षण कर. तसेच, सर्व मनुष्यरुपी मनुष्यदैत्यांचा विनाश कर आणि परत या पृथ्वीतलावर निसर्गाचे, पर्यावरणाचे संतुलन स्थिर राहावे. तसेच, तुझ्या सर्व भक्तांना सर्व मानवजातीला सुखसमृध्द कर. त्यांची दू:खे, त्यांच्या वेदना, काळजी, भीती,चिंता सर्व समस्या नाहीशा कर अशी तुझ्या चरणीं माझी कळकळीची नम्र प्रार्थना आहे व तुझ्या चरणी साष्टांग दंडवत आहे. श्रीतुळजाभवानी माता नमः ! श्रीजगदंबामाता नम:! आई राधा उदोउदो! श्रीतुळजाभवानी देवीच्या कृपेने माझ्या हातून रचना झालेले याबाबतचे समर्पक असे धार्मिक गीत खालीलप्रमाणे सादर केले आहे.

''महिषासूरमर्दिनी गीत''

जय जय महिषासूरमर्दिनी
जय जय महिषासूरमर्दिनी
तव भक्तांचे रक्षण करण्या
दावी गे सामर्थ्य,शक्ती तुझी

दूष्ट,मनुष्यदैत्य माजले कलियुगी
थोडीशी ना उरली सुखाची सुगी
पूर्वयुगी तू चंडमुंड दैत्य मारीले
भूलोकीअवघ्या भक्तांसी सुखी केले

आबालवृद्ध,महिला, बाल मुलेमुली
एकविसाव्या शतकी बहू त्रासली गेली
महिषासूराधिक मनुष्यदैत्य बहू माजले
विनाश त्यांचा करण्या माते पाव सत्वरी
देवांचे, वसुंधरेचे रक्षण करण्यासी सदैव
धावलीस त्वरेने घेऊनी अस्त्रे,खड्गे करी
अंबामाते! आताही काळ पातला तैसा भूवरी
दंडवत मम तवचरणी! धाव घे माते सत्वरी!

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559